# AZAD MAHAVIDYALAYA, AUSA

## NEWS PAPER CUTTINGS

दैनिक ग्रामीण जनतेचे मुखपत्र

गुरुधर्म.

संस्थापक : नारायणराव हंचाटे (नाना)

Email :- dailygurudharm.ausa@gmail.com पोस्टल रजि. नं. L2/RNP/OMD-15/2021-2023

क्रं. १४४ वा सोमवार दिनांक १८ ऑक्टोबर २०२१ आर. एन. आय. ५७११४/८२ www.dailyg

# आझादमध्ये संशोधन लेखन व प्रकाशन यावरील परिसंवाद संपन्न

औसा, दि. १७ : येथील आझाद महाविद्यालय व आर्ट, सायन्स, कॉमर्स कॉलेज नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने भौतिकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स विभागातर्फे सिम्पोझियम ऑन रिसर्च पेपर अँड इट्स पब्लिकेशन या विषयावरील ऑनलाईन एकदिवसीय राष्ट्रीयस्तर परिसंवाद दि.१३ ऑक्टोबर २१ रोजी संपन्न झाला.या परिसंवादासाठी बीजभाषक म्हणून प्रा डॉ.एम .डी सिरसाट(भौतिकशास्त्र वि.प्रमुख डॉ.बा.आ.म.वि.औरंगाबाद) तर साधनव्यक्ती म्हणून प्रा डॉ.पी.एम डोंगरे ( जीवभौतिकशास्त्र वि.प्रमुख मुंबई विद्यापीठ) हे होते.परिसंवादास पॅट्रान म्हणून नगराध्यक्ष तथा संस्था सचिव डॉ. अफसर शेख उपस्थित होते. परिसंवादाचे मुख्य आयोजक प्राचार्य डॉ.ई.यू मासूमदार हे अध्यक्षस्थानी व नळदुर्ग कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस.एल कोरेकर सह आयोजक म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रा डॉ. सिरसाट यांनी संशोधन पेपर लिहण्याचे स्किल, जर्नलची निवड आदी बाबींवर मार्गदर्शन केले. तसेच प्रा डॉ.डोंगरे यांनी संशोधन कसे असावे, त्याचा डाटा कसा तयार करावा याबद्दल माहिती सांगितली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.मासूम दार सरांनी करतांना परिसंवाद आयोजनाची उपयुक्तता सर्वांना सांगितली. प्रास्तविक प्रा डॉ.एम.ए बरोटे, सूत्रसंचालन प्रा डॉ.बी.डी इंगळे, पाहुण्याचा परिचय प्रा डॉ.आर.व्ही सूर्यवंशी, प्रा.एम.बी झाडे यांनी तर आभार प्रा डॉ.आर.एम महिंद्रकर मॅडम यांनी केले.कार्यक्रम यशस्वितेसाठी उपप्राचार्य टी.ए जहागीरदार, प्रा डॉ. एन.के सय्यद, प्रा.जी.डी टिंगरे यांनी प्रयत्न केले.या परिसंवादास देशभरातील प्राध्यापकांनी आपला सहभाग नोंदविला.

RNI No. MAH-MAR/2011/39378

पो.क्र. ओ.एम.डी.-३४९/२०१४-१६

गावकऱ्यांचं

# मनोगत

email: manogat.ausa@gmail.com | मुख्य संपादक : तिपण्णप्पा राचट्टे

★ cell : 9623790071 ★ Off. Ph. 8432654109 ★ Cell : 9096692586

३ | लातूर-औसा | मंगळवार दि. १९ ऑक्टोबर २०२१

## आझादमध्ये संशोधन लेखन व प्रकाशन यावरील परिसंवाद संपन्न

औसा/प्रतिनिधी : औसा येथील आझाद महाविद्यालय व आर्ट, सायन्स, कॉमर्स कॉलेज नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने भौतिकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स विभागातर्फे सिम्पोझियम ऑन रिसर्च पेपर अँड इट्स पब्लिकेशन या विषयावरील ऑनलाईन एकदिवसीय राष्ट्रीयस्तर परिसंवाद दि.१३ ऑक्टोबर २१ रोजी संपन्न झाला.या परिसंवादासाठी बीजभाषक म्हणून प्रा डॉ.एम .डी सिरसाट(भौतिकशास्त्र वि.प्रमुख डॉ.बा.आ.म.वि.औरंगाबाद) तर साधनव्यक्ती म्हणून प्रा डॉ.पी.एम डोंगरे ( जीवभौतिकशास्त्र वि.प्रमुख मुंबई विद्यापीठ) हे होते.परिसंवादास पॅट्रन म्हणून नगराध्यक्ष तथा संस्था सचिव डॉ. अफसर शेख उपस्थित होते. परिसंवादाचे मुख्य आयोजक प्राचार्य डॉ.ई.यू मासूमदार हे अध्यक्षस्थानी व नळदुर्ग कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.एल कोरेकर सह आयोजक म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रा डॉ. सिरसाट यांनी संशोधन पेपर लिहण्याचे स्किल, जर्नलची निवड आदी बाबींवर मार्गदर्शन केले. तसेच प्रा.डॉ.डोंगरे यांनी संशोधन कसे असावे, त्याचा डाटा कसा तयार करावा याबद्दल माहिती सांगितली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.मासूम दार सरांनी करतांना परिसंवाद आयोजनाची उपयुक्तता सर्वांना सांगितली. प्रास्तविक प्रा डॉ.एम.ए बरोटे, सूत्रसंचालन प्रा डॉ.बी.डी इंगळे, पाहुण्याचा परिचय प्रा डॉ.आर. व्हीं सूर्यवंशी, प्रा.एम.बी झाडे यांनी तर आभार प्रा डॉ.आर.एम महिंद्रकर मॅडम यांनी केले.कार्यक्रम यशस्वितेसाठी उपप्राचार्य टी.ए जहागीरदार, प्रा डॉ. एन.के सय्यद, प्रा.जी.डी टिंगरे यांनी प्रयत्न केले.या परिसंवादास .देशभरातील प्राध्यापकांनी आपला सहभाग नोंदविला.

RNI No. MAH-MAR/2011/39378
पो.क्र. ओ.एम.डी.-३४९/२०१४-१६

# गावकऱ्यांचं मनोगत

email: manogat.ausa@gmail.com
मुख्य संपादक : तिपण्णप्पा राचट्टे

★ cell : 9623790071 ★ Off. Ph. 8432654109 ★ Cell : 9096692586

लातूर-औसा बुधवार दि. १३ ऑक्टोबर २०२१

## आझाद महाविद्यालयात उद्योजकता विकासावर राष्ट्रीय परिषद संपन्न

औसा/प्रतिनिधी : औसा येथील आझाद महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक ११ ऑक्टोबर रोजी उद्योजकता विकास या विषयावरील एकदिवसीय ऑनलाइन पद्धतीने राष्ट्रीय परिषद संपन्न झाली. या परिषदेसाठी बीजभाषक म्हणून प्रा.डॉ शाहूराज मुळे (अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव) तर साधन व्यक्ती म्हणून प्रा.डॉ विलास चौहान (वाणिज्य विभाग,महाराज सयाजीराव विद्यापीठ बडोदा,गुजरात) हे उपस्थित होते. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ई.यू. मासूमदार हे होते,परिषदेस संबोधीत करताना शाहूराज मुळे यांनी उद्योजकता विकास विषयाची सखोल सिद्धांतीक बाजू मांडून सविस्तर मार्गदर्शन केले,तर विलास चौहान यांनी उद्योजकता विकासाची गरज, महत्व व उद्योजकता विकासाच्या तांत्रिक बाबी, उद्योजकता विकासाची भारतीय अर्थव्यवस्थे मधील भूमिका यावर सखोल चर्चा केली. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.ई.यू. मासुमदार यांनी भारतीय तरुणात उद्योजकता रुजली पाहिजे त्याशिवाय आपला देश विकसित होणार नाही ,तसेच महाविद्यालयीन शिक्षणामधूनच उद्योजकतेची ओळख विद्यार्थ्यांना झाली पाहिजे असे ते म्हणाले. या परिषदेचे प्रास्ताविक प्रा.डॉ शाम पाडे यांनी तर सूत्रसंचालन प्रा.डॉ एम.एम इनामदार यांनी केले.पाहुण्यांचा परिचय प्रा.एम.बी झाडे यांनी तर आभार प्रा. डॉ. एस एस. कोरडे यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य टी ए.जहागीरदार, प्रा डॉ एन.के सय्यद, प्रा.डॉ एम.ए बरोटे यांनी परिश्रम घेतले या ऑनलाईन परिषदेस देशभरातून बहुसंख्येने शिक्षक,प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.